| | |
|---|---|
| | **दाखल तारीख** : १०/०३/२०२३<br>**नोंदणी तारीख** : १३/०३/२०२३<br>**निकाल तारीख** : ०७/०७/२०२६<br>**कालावधी** : ०३ व.०३ म.२५ दि. |

**पैठण येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालयात**

**(पीठासीन अधिकारी – श्रीमती. एस. के. देशमुख)**

**कौ.हिं.सं.का.अर्ज क्र.२०/२०२३**
**निशाणी क्र.२३**

१. **सपना शरद रोडगे,**

**वय** – २५ वर्षे, **धंदा** – घरकाम
रा. शेंदुरवादा, ता.गंगापुर, जि.छ. संभाजीनगर ,

सध्या रा. बिडकीन, ता.पैठण, जि.छ. संभाजीनगर.

२. **अरुष शरद रोडगे,**
**वय** – ५ वर्षे. धंदा– शिक्षण,

३. **अशिश शरद रोडगे,**
**वय** – ०३ वर्षे. धंदा– शिक्षण, **अर्जदार**

**विरुध्द**

१. **शरद रावसाहेब रोडगे,**
वय – ३५ वर्षे, धंदा– शेती व खाजगी नोकरी,

रा. शेंदुरवादा, ता.गंगापुर, जि.छ. संभाजीनगर

**गैरअर्जदार**

---

**अर्जदारतर्फे विधीज्ञ** – श्री. बी.टी. नवले.

**गैरअर्जदारतर्फे विधीज्ञ** – श्री. जी.एस.काकडे.

---

## न्यायनिर्णय

(घोषीत दिनांक – ०७ जुलै २०२६)

प्रस्तुत अर्ज महिलांचे घरगुती हिंसाचापासून संरक्षण कायदा २००५ चे कलम १२,१८, १९, २०, २१, २२ व २३ प्रमाणे दाखल केला आहे.

**अर्जदार हिचे अर्जातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणे –**

**०२.** अर्जदार नं. १ व गैरअर्जदार यांचा विवाह दिनांक २६/०५/२०१७ रोजी ज्ञानेश्वर मंगल कार्यालय, बिडकीन येथे ५ ग्रॅमची अंगठी देवुन सर्व मानापानासह झाला. सदर विवाह संबंधातुन अर्जदार नं. १ व गैरअर्जदार यांना अर्जदार नं. २ व ३ हे अपत्य झालेले आहे. अर्जदार व गैरअर्जदार नं. १ यांचे पती–पत्नीचे नातेसंबंध आजतागयत कायम आहे.

**०३.** अर्जदार पुढे कथन करते की, लग्नानंतर अर्जदार नं. १ ही गैरअर्जदाराची पत्नी म्हणुन मौजे शेंदुरवादा, ता. गंगापुर येथे गैरअर्जदाराच्या घरी नांदण्यास गेली. तेंव्हा गैरअर्जदार हा स्वतः, त्याची आई व अर्जदार असे राहत होते. गैरअर्जदाराने अर्जदार नं. १ हिस मुलगा अर्जदार नं. २ हा होईपर्यंत चांगले नांदिवले. तदनंतर गैरअर्जदार नेहमी दारु पिवुन येवुन अर्जदारास मारहाण करु लागला. दिवसंदिवसभर घरामध्ये बसुन राहुन अर्जदाराचा शारिरीक व मानसिक छळ करु लागला. त्यामध्ये अर्जदाराची सासु, नंनद व भावजाई या देखील गैरअर्जदारास मारहाण करण्यास प्रोत्साहन देत असत. गैरअर्जदार हा अर्जदार नं. २ व ३ या लहान मुलांना देखील मारहाण करत असत.

**०४.** अर्जदार पुढे कथन करते की, अर्जदार नं. १ ही पाच महिन्याची गर्भवती असतांना गैरअर्जदाराने तिला मारहाण करुन घराच्या बाहेर हाकलून दिले. त्यानंतर अर्जदार नं. १ हिस तिच्या माहेरी मुलगा झाला. मुलास बघण्यासाठी ९ महिनेपर्यंत गैरअर्जदार व त्याच्या घरातील कोणतीही मंडळी आलेली नाही. परंतु झाले गेले सर्व विसरुन अर्जदाराच्या आई–वडीलांनी मुलीचा संसार व्हावा या हेतुने अर्जदारास परत गैरअर्जदाराकडे नांदण्यास पाठविले. त्यावेळेस गैरअर्जदार हा अर्जदार नं. १ हिस घेवुन पुणे येथे राहण्यास गेला. परंतु गैरअर्जदाराच्या वागण्यात काहीही बदल झाला नाही, तो

तेथे देखील अर्जदारास त्रास देवु लागला, तो नेहमी अर्जदार नं. १ हिच्यावर संशय घेवुन तिला मारहाण करु लागला. एक दिवस गैरअर्जदाराने अर्जदार नं. १ हिस मारहाण करुन घरातुन बाहेर हाकलून दिले व घरास कुलुप लावुन घेतले, तेंव्हा अर्जदार नं. १ ने शेजारांच्या फोनवरुन तिच्या आई–वडीलांना पुणे येथे बोलावुन घेतले व त्यांच्यासोबत माहेरी आली. त्यानंतर अर्जदार ही काही दिवस आई–वडीलांकडे राहिल्यानंतर तिच्या आई–वडीलांनी गैरअर्जदारास समजावुन सांगुन अर्जदार नं. १ हिस चांगले नांदविण्याची विनंती केली व अर्जदार नं. १ हिस गैरअर्जदाराकडे नांदण्यास पाठविले.

०५. अर्जदार पुढे कथन करते की, गैरअर्जदार नं. १ हा नेहमी त्याच्या आईचे व भावजाईचे ऐकुन अर्जदार नं. १ हिस मारहाण करत असे व मुलांची देखील कोणत्याही प्रकारे काळजी घेत नसे. उलट अर्जदार नं. १ हिस "तु लोकांच्या शेतामध्ये कामाला जा व पैसे आणुन दे" असे म्हणुन मारहाण करत असत. सुरुवातीस अर्जदार नं. १ च्या आई–वडीलांनी वेळोवेळी आर्थिक मदत केलेली आहे. परंतु तरी देखील गैरअर्जदार व त्याचे कुटूंबिय नेहमी वडीलांकडुन पैसे आणण्याचा तगादा लावत असे. त्यावेळेस अर्जदार ही गैरअर्जदारास "मुले छोटे आहे आणि मी सुध्दा आजारी आहे, माझ्या आई–वडीलांची आर्थिक परिस्थिती ही गरीबीची आहे, त्यामुळे माझे आई–वडील तुम्हाला सध्या तरी आर्थिक मदत करु शकत नाही" असे म्हणुन समजावुन सांगण्याचा प्रयत्न केला असता गैरअर्जदाराने अर्जदार नं. १ हिस बेदम मारहाण करत व तिचा शारिरीक व मानसिक छळ करत असत व गैरअर्जदार हा अर्जदार नं. १ हिस "तुला जर काम होत नसेल तर तुझ्या आई–वडीलांकडुन पैसे घेवुन ये, अन्यथा आम्ही तुला नांदविणार नाही" अशी भाषा करत असे.

०६. अर्जदार पुढे कथन करते की, दिनांक २७/११/२०२२ रोजी गैरअर्जदार नं. १ व त्यांच्या नातेवाईकांनी अर्जदार नं. १ हिस शुल्लक कारणावरुन मारहाण व शिवीगाळ करुन नेसत्या वस्त्रानिशी तिला घराच्या बाहेर अज्ञान मुलांसह हाकलून दिले. अर्जदार नं. १ हिस त्यावेळी जास्तीचा मार लागल्यामुळे तिने पोलीस स्टेशन वाळुन येथे गेले असता पोलीसांनी वैदयकीय पत्र देवुन घाटी रुग्णालय येथे उपचाराकामी पाठविले व तेथे एनसीआर नं. ०८१२/२०२२ हा दिनांक

२८/११/२०२२ रोजी नोंदवुन घेतला. तेंव्हापासुन अर्जदार ही तिच्या माहेरी राहत आहे.

**०७.** अर्जदार पुढे कथन करते की, गैरअर्जदारांनी दिलेल्या मानसिक व शारिरीक त्रासामुळे अर्जदार ही नेहमी आजारी असते व तिला कोणताही कामधंदा होत नाही. अर्जदार नं. १ ही स्वतःचा व तिच्या अज्ञान मुलांचा उदरनिर्वाह भागविण्यास असमर्थ आहे. गैरअर्जदाराने अर्जदारांकडे पुर्णपणे दुर्लक्ष केलेले आहे. उलट गैरअर्जदारास मौजे शेंदुरवादा, ता. पैठण येथील जमीन गट नं. ८१, क्षेत्रफळ ८० आर अशी बागायती शेत जमीन आहे, त्यापासुन त्याला २ ते ३ लाख रुपयाचे उत्पन्न वर्षाकाठी मिळते. त्याचप्रमाणे गैरअर्जदार हा खाजगी नोकरी करुन महिन्याकाठी २५ ते ३० हजार रुपये पगार मिळवतो. गैरअर्जदाराचे स्वतःचे मोठे घर आहे. अशा प्रकारे गैरअर्जदाराची आर्थिक परिस्थिती चांगली आहे व गैरअर्जदारास अर्जदारांव्यतिरिक्त इतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची जबाबदारी नाही. गैरअर्जदार हा अर्जदार यांना पोटगी देण्यास सक्षम आहे. त्यामुळे अर्ज मंजुर करावा अशी विनंती केली.

**०८.** गैरअर्जदार तर्फे म्हणणे नि.क्र. १३ वर दाखल करुन अर्जातील कथन अमान्य व नाकबूल केले आहे. गैरअर्जदार यांच्या कथनानुसार अर्जदार ही विवाह नंतर नांदायला आल्यावर गैरअर्जदार व त्याच्या कुटुंबातील लोकांनी छोटया छोटया कारणावरुन त्रास देऊन छळ करत होते. अर्जदार ही फक्त चार महिने व्यवस्थित नांदली. तिची गैरअर्जदार सोबत नांदण्याची इच्छा नव्हती. अर्जदार ही गैरअर्जदार आणि त्याच्या कुटुंबातील लोकांना शिवीगाळ करुन अपमानास्पद वागणूक देऊन त्रास देत होती. कॉलेजचे खोटे कारण सांगूण माहेरी जाऊन राहत होती. त्यानंतर गैरअर्जदार हिला नांदण्यास घेऊन येत असे. अर्जदार क्र.१ चे वागणे दिवसेंदिवसे जास्तच तऱ्हेवाईक होत गेले. दि.२७/११/२०२२ रोजी अर्जदार क्र.१ हिने तिच्या माहेरच्या लोकांना बोलावून गॅसच्या कारणावरुन गैरअर्जदार यास व त्यांच्या नातेवाईकास मारहाण, शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. याबाबत वाळूज पोलिस स्टेशन गुन्हा क्र.३६६/२०२२ दाखल केला आहे.

०९. गैरअर्जदारचे पुढे कथन आहे की, अर्जदार क्र.१ हिने स्वत:हून त्याचा त्याग करुन माहेरी राहून ऐशआरामाचे जिवन जगत आहे. त्याच्यावर वयोवृध्द आईची जबाबदारी आहे. अर्जदार ही गैरअर्जदार यास नेहमी म्हणत असे की, आपण माहेरी राहू, तुम्ही तिकडेच काम करा. परंतु त्याचेवर आईची जबाबदारी असल्याने अर्जदार क्र.१ ची समजूत घालत आला आहे. परंतु अर्जदार हिस तिच्या माहेर कडील लोकांची साथ असल्यामुळे गैरअर्जदार याचा त्याग करुन स्वच्छंदी जिवन जगत आहे.

१०. गैरअर्जदाराचे पुढे कथन आहे की, अर्जदार ही बिडकीन येथील कंपनीमध्ये कामास असून तिला दर महा रु.१५,०००/– ते रु.२०,०००/– पगार मिळतो. तसेच अर्जदार हिस शिलाई मशिनचे कामामधून दर महा रु.१५,०००/– मिळते. अर्जदाराच्या माहेरी दोन एकर बागयत शेती आहे, दोन मोठी घरे आहे. अर्जदार ही अर्जदार क्र.२ व ३ यांचा सांभाळ करण्यास समर्थ आहे. अर्जदार हिस प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास सयुक्तिक कारण घडले नाही. गैरअर्जदार याचा छळ करण्यासाठी अर्ज दिला आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

११. अर्जदार व गैरअर्जदार यांच्या कथनाचा व दाखल कागदपत्रांचा विचार करुन खालील मुद्दे विचारात घेण्यात येतात. सदर मुद्दयांवर कारणमिमांसेसह निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १) | अर्जदाराचा जाबदाराकडून कौटुंबिक हिंसाचार झाला, हे ती सिद्ध करते काय ? | .. | **होकारार्थी.** |
| २) | अर्जदार ही मागणी केल्याप्रमाणे संरक्षण आदेश मिळण्यास पात्र आहे काय ? | | **होकारार्थी.** |
| ३) | अर्जदार ही मागणी केल्याप्रमाणे पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? | .. | **अंशतः होकारार्थी.** |
| ४) | अर्जदार ही मागणी केल्याप्रमाणे मनाई हुकूमास पात्र आहे काय ? | .. | **नकारार्थी.** |

| | | | |
|---|---|---|---|
| ५) | अर्जदार ही मागणी केल्याप्रमाणे औषध औपचारासाठी, आर्थिक सहाय्य, शारिरीक व मानसिक त्रासासाठी नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहे काय? | | **अंशत: होकारार्थी** |
| ६) | अर्जदार ही मागणी केल्याप्रमाणे घरभाडेची रक्कम मिळण्यास पात्र आहे काय ? | .. | **नकारार्थी.** |
| ७) | आदेश काय ? | .. | **अर्ज अंशतः मंजुर.** |

## कारणमिमांसा

**१२.** अर्जदारने तिचे कथनापृष्टयर्थ सरतपासाचे प्रतिज्ञापत्र (निशाणी १४) वर दिले आहे. तसेच अर्जदारने संपत्ती व उत्तरदायित्वाचे शपथपत्र (निशाणी ०२) कडे दाखल केले आहे. ज्यादा पुरावा देण्याचा नसल्याची पुरसीस (निशाणी १९) कडे दिली आहे.

**१३.** गैरअर्जदार तर्फे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र निशानी २१ वर दिले आहे. गैरअर्जदार दि.०७.०३.२०२६ रोजी पुरावा बंद आदेश केलेला आहे.

**१४.** अर्जदार तर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. गैरअर्जदार तर्फे युक्तीवाद नाही.

**मुद्दे क्र. १ व २ बाबत –**

**१५.** अर्जदार क्र. १ ने स्वतःचे शपथपत्रामध्ये तिच्यावर झालेल्या कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांचे वर्णन केलेले आहे. तिने तिच्या शपथपत्रामध्ये असे नमूद केले आहे की, गैरअर्जदार हा नेहमी दारु पिवुन येवुन अर्जदारास मारहाण करु लागला. दिवसंदिवसभर घरामध्ये बसुन राहुन अर्जदाराचा शारिरीक व मानसिक छळ करु लागला. त्यामध्ये अर्जदाराची सासु, नंनद व भावजाई या देखील गैरअर्जदारास मारहाण करण्यास प्रोत्साहन देत असत. गैरअर्जदार हा अर्जदार नं. २ व ३ या लहान मुलांना देखील मारहाण करत असत. अर्जदार नं. १ ही पाच महिन्याची गर्भवती असतांना गैरअर्जदाराने तिला मारहाण करुन घराच्या बाहेर हाकलून दिले. मुलास बघण्यासाठी ९ महिनेपर्यंत गैरअर्जदार व त्याच्या घरातील कोणतीही मंडळी आलेली नाही. तो पुणे येथे गेल्यावर तेथे नेहमी अर्जदार नं. १ हिच्यावर संशय घेवुन तिला मारहाण करु लागला. एक दिवस गैरअर्जदाराने अर्जदार नं. १ हिस मारहाण करुन घरातुन बाहेर हाकलून दिले व घरास

कुलुप लावुन घेतले, गैरअर्जदार नं. १ हा नेहमी त्याच्या आईचे व भावजाईचे ऐकुन अर्जदार नं. १ हिस मारहाण करत असे व मुलांची देखील कोणत्याही प्रकारे काळजी घेत नसे. उलट अर्जदार नं. १ हिस "तु लोकांच्या शेतामध्ये कामाला जा व पैसे आणुन दे" असे म्हणुन मारहाण करत असत. गैरअर्जदार व त्याचे कुटूंबिय नेहमी वडीलांकडुन पैसे आणण्याचा तगादा लावत असे. गैरअर्जदार हा अर्जदार नं. १ हिस "तुला जर काम होत नसेल तर तुझ्या आई–वडीलांकडुन पैसे घेवुन ये, अन्यथा आम्ही तुला नांदविणार नाही" अशी भाषा करत असे. दिनांक २७/११/२०२२ रोजी गैरअर्जदार नं. १ व त्यांच्या नातेवाईकांनी अर्जदार नं. १ हिस मारहाण व शिवीगाळ करुन नेसत्या वस्रानिशी तिला अज्ञान मुलांसह हाकलून दिले. अर्जदार नं. १ हिस त्यावेळी जास्तीचा मार लागल्यामुळे तिने पोलीस स्टेशन वाळुन येथे गेले असता पोलीसांनी वैदयकीय पत्र देवुन घाटी रुग्णालय येथे उपचाराकामी पाठविले व तेथे एनसीआर नं. ०८१२/२०२२ हा दिनांक २८/११/२०२२ रोजी नोंदवुन घेतला.

**१६.** अर्जदाराने तिच्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रामध्ये तिच्यासोबत कौटुंबीक हिंसाचार झाल्याची बाब शपथेवर कथन केली आहे. गैरअर्जदार याने अर्जदार यांच्या सोबत त्याचे नातेसंबंध मान्य व कबुल केले आहे. परंतु अर्जदाराचे कौटुंबिक हिंसाचारबाबतचे कथन नाकारले आहे. गैरअर्जदारतर्फे अर्जदार हिस उलटतपासात विचारलेल्या सर्व प्रश्नांना अर्जदाराने नकारार्थी उत्तरे दिली आहे. अर्जदारचे पुराव्यामधील कथन विनाआव्हानीत राहिले. गैरअर्जदार तर्फे त्याचे कथनापुष्टयर्थ पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले परंतु गैरअर्जदार हा उलटतपास देण्यासाठी हजर राहिला नाही. त्यामुळे त्याचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्रामधील कथन विचारात घेता येणार नाही. गैरअर्जदार याचे विरुध्द पुरावा नाही आदेश झालेला आहे. अर्जदाराच्या पुराव्यावरुन गैरअर्जदार यांनी अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार केल्याचे सिध्द होते. गैरअर्जदार यांनी अर्जदारचा कौटुंबिक हिंसाचार केल्यामुळे ती गैरअर्जदाराविरुध्द संरक्षणात्मक आदेश मिळणेस पात्र आहे. सबब, मुद्दा क्र.१ व २ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवत आहे.

**मुद्दा क्र.३ बाबत** –

**१७.** अर्जदारचे प्रतिज्ञापत्रामध्ये कथन केले आहे की, अर्जदार ही माहेरी आले पासून गैरअर्जदार याने त्यांची आर्थिक व्यवस्था केलेली नाही किंवा त्यांची चौकशी केली नाही. त्यांचा सांभाळ, पालनपोषण, शिक्षण करण्याचा कोणताही प्रयत्न केलेला नाही. अर्जदार हिस उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. तिच्यावर अर्जदार क्र.२ व ३ यांची पालणपोषणाची जबाबदारी आहे. यामुळे गैरअर्जदार याच्याकडे खाजगी नोकरी करुन दरमहा रु.२५,०००/– ते रु.३०,०००/– कमावतो. त्याचे नावे मौजे शेंदुरवादा, ता.पैठण येथे गट क्र. ८१ मध्ये ८० आर क्षेत्र बागायती आहे. त्यामधून त्याला दरसाल रु.२,००,०००/– ते रु.३,००,०००/– उत्पन्न मिळते. त्यामुळे गैरअर्जदार हा अर्जदार यांना पोटगी देण्यास समर्थ आहे.

**१८.** गैरअर्जदार यास मौजे शेंदुरवादा येथे गट क्र. ८१ मध्ये ८० आर क्षेत्र आहे हे ७/१२ उताऱ्यावरुन प्रथमदर्शनी दिसून येते. सदरचे कथन गैरअर्जदार यांनी नाकारलेले नाही. परंतु सदर मिळकतीमधून कोणते बागायती उत्पन्न मिळते, त्यातून गैरअर्जदार यांना निश्चित किती उत्पन्न मिळते याबाबत अर्जदारने पुरावा दिलेला नाही. त्यामुळे गैरअर्जदार यास शेत मिळकतीमधून निश्चित उत्पन्न किती मिळते याबाबत निष्कर्ष काढता येणार नाही. सर्वसाधारणपणे सदर मिळकतीमधून कोणतेही उत्पन्न घेतल्यावर गैरअर्जदार यास दरसाल सर्व खर्च जाऊन अंदाजे रु. ५०,०००/– ते रु.१,००,०००/– उत्पन्न मिळू शकते असे ग्राहय धरणे योग्य आहे. तसेच गैरअर्जदार यांचे वयोमान विचारात घेता कोणताही कामधंदा करुन त्यास दरमहा अंदाजे वीस ते पंचवीस हजार रुपये एवढे उत्पन्न मिळू शकते. यावरुन गैरअर्जदार यास पुरेसे उत्पन्न असल्याचे दिसून येते.

**१९.** गैरअर्जदार याने त्याच्या उत्पन्नाबाबतचे कथन नाकारले आहे. परंतु गैरअर्जदार याने अर्जदार यांना उलटतपास घेण्याची संधी दिलेली नाही त्यामुळे त्याचे म्हणणे पुरावा म्हणून वाचता येणार नाही. अर्जदाराने तिचे उत्पन्न व दायित्व प्रतिज्ञापत्रामध्ये तिला कोणतेही उत्पन्नाचे साधन नसल्याचे नमूद केले आहे. तसेच नि.क्र. १५ सोबत अर्जदार क्र.२ व ३ च्या शैक्षणिक खर्चाबाबत सेंट पोप जॉन पॉल शाळेचे पत्र

जोडलेले आहे त्यावरुन अर्जदार क्र.२ व ३ यांचा प्रत्येकी शैक्षणिक फिचा खर्च रक्कम रु.१६,३५०/– प्रतिवर्षी असल्याचे दिसून येते.

२०. गैरअर्जदार याच्या निश्चित उत्पन्नाबाबत अर्जदाराने पुरावा दिलेला नसला तरी देखील गैरअर्जदार यांच्या नावे असलेले मिळकतीमधून त्यांना पुरेसे उत्पन्नाचे साधन असतानाही त्याने अर्जदारांची कोणतीच व्यवस्था केली नसल्याचे तसेच त्यांचा सांभाळ करण्यास दुर्लक्ष करत असल्याचे सिध्द होते. गैरअर्जदारच्या उत्पन्नाचा तसेच अर्जदार यांच्या गरजांचा, वाढलेल्या महागाईचा, दैनंदिन वाढलेल्या गरजांचा व त्यांच्या राहणीमानाचा विचार करता, अर्जदार क्र.१ ते ३ यांना उदरनिर्वाहासाठी, दैनदिंन गरजांसाठी, औषधोपचारासाठी व इतर खर्चासाठी दरमहा प्रत्येकी रक्कम रु. २०००/–. तसेच अर्जदार क्र.२ व ३ च्या शैक्षणिक खर्चासाठी दरमहा प्रत्येकी रु.२,०००/– पोटगी म्हणून मंजूर करणे योग्य होईल. सबब, मुद्दा क्र.३ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदवला आहे.

<u>मुद्दा क्र. ४ बाबत –</u>

२१. गैरअर्जदार याचे नावे मौजे शेंदुरवादा, ता.पैठण येथे गट क्र. ८१ मध्ये ८० आर क्षेत्राबाबत हस्तांतरण करण्याबाबत मनाई आदेश मिळण्याची विनंती केली आहे. परंतु सदरची मिळकत गैरअर्जदार याचे नाव कोणत्या प्रकारे आलेली आहे याबाबत अर्जदाराने पुरावा दिलेला नाही. तसेच सदर मिळकतीमध्ये अर्जदार यांचा हक्क, हिस्सा आहे याबाबत कोणताही पुरावा दिलेला नाही. अशा परिस्थितीत सदर मिळकतीमध्ये मनाई आदेश देणे योग्य व न्याय नाही. सबब, मुद्दा क्र.४ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवला आहे.

<u>मुद्दा क्र. ५ बाबत –</u>

२२. अर्जदारने गैरअर्जदार कडून नुकसान भरपाई मागणी केली आहे. गैरअर्जदार ने केलेल्या कौटुंबिक हिंसाचारामुळे अर्जदारला काही गंभीर शारीरिक दुखापत झाल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा अर्जदारने न्यायालयात दाखल केलेला नाही. गैरअर्जदार याने अर्जदारवर कौटुंबिक हिंसाचार केल्याचे सिध्द केलेले आहे. अशा परिस्थितीत,

अर्जदारने तिच्या पुराव्याचे शपथपत्रामध्ये नमुद केलेल्या कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांचा विचार करता, अर्जदारला गैरअर्जदार याचेकडून रक्कम रु.४०,०००/– एवढी नुकसान भरपाई मंजूर करणे योग्य होईल. सबब, मुद्दा क्र.५ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदविला आहे.

**मुद्दा क्र. ६ बाबत –**

**२३.** अर्जदार यांनी घरभाडे मिळण्याची मागणी केली आहे. अर्जदाराने मालमत्ता व दायित्व प्रतिज्ञापत्रामध्ये ती वडीलांच्या घरी राहते असे नमूद केलेले आहे. भाडे करार, मालमत्ता क्रमांक, भाडयाची रक्कम, कालावधी याबाबत पुरावा दिलेला नाही. त्यामुळे अर्जदार या भाडयाच्या घरामध्ये राहतात व त्यास घरभाडे द्यावे लागते याबाबत निष्कर्ष काढता येत नाही. याउलट अर्जदार ही वडीलांच्या घरी राहते, त्यामुळे अर्जदार या स्वतंत्र घरभाडे मिळण्यास पात्र नाही. सबब मुद्दा क्र. ६ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविला आहे.

**मुद्दा क्र.७ बाबत** –

**२४.** गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार क्र.१ चा पती व अर्जदार क्र.२ व ३ चे वडील म्हणून त्यांना सांभाळण्यास बांधील आहे. गैरअर्जदार यास वयोवृध्द आईची जबाबादारी आहे ही बाब अर्जदाराने उलटतपासात मान्य केली असली तरी देखील अर्जदार यांची जबाबदारी गैरअर्जदार यास नाकारता येणार नाही. मुद्दे क्र.१ ते ६ यांचे निष्कर्षांचा विचार करता अर्जदार हिचा अर्ज अंशतः मंजूर होणेस पात्र आहे. सबब मुद्दा क्र.७ साठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे –

**आदेश**

१. अर्ज अंशतः मंजूर करणेत येत आहे.

२. गैरअर्जदार याने अर्जदार हिचा यापुढे कोणत्याही प्रकारे कौटुंबिक हिंसाचार करु नये.

३. गैरअर्जदार यास आदेश देण्यात येतो की, त्याने प्रस्तुतचा अर्ज दाखल तारखेपासून पोटगी, औषधोपचार व इतर खर्चासाठी अर्जदार क्र.१ ते ३ यांना प्रत्येकी दरमहा रु.२,०००/-द्यावेत. तसेच अर्जदार क्र.२ व ३ यांचे शैक्षणिक खर्चासाठी दरमहा रक्कम रु.२,०००/- द्यावेत.

४ गैरअर्जदार याने अर्जदार यांच्यावर कोणत्याही प्रकारचा कौटुंबिक हिंसाचार करणार नाही अशा आशयाचे रक्कम रु.१५,०००/- चे बंधपत्र लिहून दयावे.

५. गैरअर्जदार यास आदेश देण्यात येतो की, त्याने अर्जदार हिला दिलेल्या शारीरिक व मानसिक त्रासाच्या नुकसानीपोटी प्रत्येकी रक्कम रु.४०,०००/- द्यावेत.

६. गैरअर्जदार याने अर्जदार यांना अर्जाचा खर्च रु.१०००/- द्यावा.

७. अर्जदार हिस निकालपत्राची एक प्रत मोफत देण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SEEMA KETAN DESHMUKH
Date: 2026.07.07 17:18:30 +0530

**पैठण.**
दिनांक - ०७/०७/२०२६

**( श्रीमती. एस. के. देशमुख )**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, पैठण.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | K.V. Bayas |
| (b) | Court | : | Mrs. S. K. Deshmukh,<br>2nd Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.,Paithan. |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 07/07/2026 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 07/07/2026 |